# "महात्मा बसवेश्वर यांच्या राजकीय व प्रशासकीय विचारांचा चिकीत्सक अभ्यास"

**डॉ. विश्वनाथ महादेव आवड**

राज्यशास्त्र विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07thMarch 2026

***Keywords:***

*वचन साहित्य, अभ्यास पद्धती, स्थापना आणि उद्देश, लोकशाही मूल्ये आणि कार्यपद्धती*

**ABSTRACT**

भारतीय इतिहासामध्ये १२ वे शतक हे सामाजिक आणि वैचारिक क्रांतीचे सुवर्णयुग मानले जाते. या क्रांतीचे महानायक महात्मा बसवेश्वर हे केवळ एक महान आध्यात्मिक संत नव्हते, तर ते एक द्रष्टे समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ आणि अत्यंत कुशल राजकीय प्रशासक होते. कलचुरी नरेश राजा बिज्जल यांच्या दरबारात 'महाप्रधान' (पंतप्रधान) म्हणून काम करत असताना त्यांनी प्रशासकीय व्यवस्थेला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Awad, Vishwanath Mahadev.** (2025). "महात्मा बसवेश्वर यांच्या राजकीय व प्रशासकीय विचारांचा चिकीत्सक अभ्यास".

*IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **291–296.**

## १. प्रस्तावना (Introduction)

भारतीय इतिहासामध्ये १२ वे शतक हे सामाजिक आणि वैचारिक क्रांतीचे सुवर्णयुग मानले जाते. या क्रांतीचे महानायक महात्मा बसवेश्वर हे केवळ एक महान आध्यात्मिक संत नव्हते, तर ते एक द्रष्टे समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ आणि अत्यंत कुशल राजकीय प्रशासक होते. कलचुरी नरेश राजा बिज्जल यांच्या दरबारात 'महाप्रधान' (पंतप्रधान) म्हणून काम करत असताना त्यांनी प्रशासकीय व्यवस्थेला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या राजकीय आणि प्रशासकीय विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. तत्कालीन काळात जेव्हा राजेशाहीमध्ये सत्तेचे केंद्रीकरण आणि जातीपातीचे प्राबल्य होते, अशा काळात बसवन्नांनी 'लोकशाही' (Democracy) आणि 'मानवाधिकार' (Human Rights) यांसारख्या आधुनिक संकल्पनांचे बीज पेरले.

त्यांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू हा 'माणूस' होता. **'अनुभव मंटप'** च्या माध्यमातून त्यांनी जगाला दिलेली पहिली संसद, **'कायक'** च्या माध्यमातून दिलेली श्रमाची प्रतिष्ठा आणि **'दसोह'** च्या माध्यमातून मांडलेली आर्थिक समता, हे सर्व मुद्दे आजही २१ व्या शतकातील सुशासनासाठी मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या वचनांमधून व्यक्त होणारी प्रशासकीय आचारसंहिता ही आधुनिक काळातील प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी आणि राज्यकर्त्यांसाठी आदर्श आहे.

या शोधनिबंधाचा मुख्य हेतू महात्मा बसवेश्वर यांच्या त्या महान राजकीय प्रयोगांचे चिकित्सक विश्लेषण करणे हा आहे, ज्यांनी मानवी समतेचा आणि सामाजिक न्यायाचा पाया रचला.

## २. संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय ऐतिहासिक आणि राजकीय स्वरूपाचा असल्यामुळे, माहिती संकलनासाठी मुख्यत्वे **'ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती'** वापरण्यात आली आहे.

संशोधन मांडणीसाठी खालील साधनांचा वापर करण्यात आला आहे:

**अ) प्राथमिक साधने (Primary Sources):**

१. **वचन साहित्य:** महात्मा बसवेश्वर यांची वचने हा या संशोधनाचा मूळ आणि प्रमुख आधार आहे. वचनांमधील राजकीय व प्रशासकीय संदर्भांची माहिती घेवून त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**ब) दुय्यम साधने (Secondary Sources):**

१. **ग्रंथालय संशोधन:** महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर आधारित नामवंत इतिहासकार आणि विचारवंत यांची पुस्तके अभ्यासली आहेत .

२. **संशोधन पत्रिका (Journals):** इतिहास आणि राज्यशास्त्र विषयातील विविध नियतकालिके व शोधनिबंधांचा संदर्भ घेतला आहे.

३. **इंटरनेट व ई-संसाधने:** विश्वसनीय सरकारी संकेतस्थळे आणि बसव समितीच्या डिजिटल अर्काईव्ह्जचा वापर केला आहे.

**क) अभ्यास पद्धती**

१. **तुलनात्मक पद्धती :** बसवेश्वरांची 'अनुभव मंटप' ही संकल्पना आणि आजची 'संसदीय लोकशाही' यांची तुलनात्मक मांडणी केली आहे.

## ३. संशोधनाची उद्दिष्टे

- बसवेश्वरांच्या वचनातील राजकीय, प्रशासकीय विचारांचा अभ्यास करणे
- 'अनुभव मंटप' या संकल्पनेचा लोकशाहीच्या दृष्टीने अभ्यास करणे.
- त्यांच्या 'कायक' आणि 'दसोह' या तत्त्वांचे आर्थिक-राजकीय महत्त्व तपासणे.
- समकालीन राजकारणात त्यांच्या विचारांची प्रासंगिकता स्पष्ट करणे.

**४. विषय मांडणी :**

**अ. अनुभव मंटप: भारतातील पहिली संसद**

बसवन्नांनी स्थापन केलेले 'अनुभव मंटप' हे जागतिक लोकशाहीचे आद्य रूप होते. 'अनुभव मंटप' इतिहासातील क्रांतिकारी प्रयोग होता. याला 'जगातील पहिली संसद' असे संबोधले जाते.

१. **स्थापना आणि उद्देश :** बसवन्नांनी कर्नाटक मधील कल्याण (आताचे बसवकल्याण) येथे स्थापना केली. याचा मुख्य उद्देश आध्यात्मिक चर्चा करणे हा असला, तरी प्रत्यक्षात येथे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विषयांवर उघडपणे चर्चा होत असे.

२. **अनुभव मंटपची वैशिष्ट्ये**

   १. **सर्व समान** : अनुभव मंटपचे दरवाजे सर्वांसाठी उघडे होते. मग तो राजा असो वा झाडू मारणारा, ब्राह्मण असो वा अंत्यज. याठिकाणी जाती-पातीची बंधने येथे पूर्णपणे नाकारली गेली होती. जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक दर्जाचा विचार न करता सर्वांना प्रवेश होता.

   २. **स्त्री-पुरुष समानता**: त्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान असताना, अनुभव मंटप मध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने बसून चर्चेत भाग घेण्याचा आणि आपले विचार मांडण्याचा अधिकार होता. अक्कमहादेवी, मुक्तायक्का, नीलंबिका यांसारख्या थोर विचारवंत स्त्रिया याच मंटपाची देणगी आहेत.

   ३. **अध्यक्षपद (शून्य सिंहासन)**: अनुभव मंटपचे अध्यक्षपद अल्लमा प्रभू या थोर संतांकडे होते. ते ज्या आसनावर बसत, त्याला 'शून्य सिंहासन' म्हटले जाई, जे अहंकाराचा त्याग आणि ईश्वरी सत्याचे प्रतीक होते.

   ४. **लोकशाही मूल्ये आणि कार्यपद्धती :** आधुनिक संसदिय लोकशाही आणि प्रत्यक्ष लोकशाही मध्ये आपण जे पाहतो, त्याची बीजे अनुभव मंटपमध्ये दिसतात चर्चा आणि संवादामुळे येथे कोणताही निर्णय लादला जात नसे.

   ५. **अभिव्यक्ती स्वातंत्र्य** : मंटपमधील सदस्यांनी आपले विचार ज्या भाषेत आणि शैलीत मांडले, त्याला 'वचन' असे म्हणतात. ही वचने सामान्यांच्या भाषेत (कन्नड) होती, ज्यामुळे ज्ञान केवळ संस्कृत जाणणाऱ्या वर्गापुरते मर्यादित राहिले नाही. राजापासून सामान्य नागरिकापर्यंत सर्वांना आपले मत मांडण्याचा समान अधिकार होता.

   ६. **सामूहिक निर्णय** : समाजातील विविध व्यावसायिकांचे (कायकजीवी) अनुभव ऐकून घेऊन धोरणे ठरवली जात असत. सत्ता एका व्यक्तीच्या हातात न राहता ती चर्चेद्वारे चालवली जावे, हा त्यांचा आग्रह होता.

**ब. कायक आणि दसोह :**

महात्मा बसवेश्वर यांनी मांडलेल्या 'कायक' आणि 'दसोह' या दोन संकल्पना त्यांच्या सामाजिक-आर्थिक क्रांतीचा कणा आहेत. या संकल्पनांनी केवळ माणसाला कष्टाची किंमत शिकवली नाही, तर समाजातील विषमतेवरही प्रहार केला.

***कायक - 'कष्ट हेच कैलास' :** 'कायक' या शब्दाचा उगम 'काया' (शरीर) या शब्दापासून झाला आहे. शरीराने केलेले प्रामाणिक श्रम म्हणजे कायक.

या संकल्पनेत खालील गोष्टी महत्वाच्या मानलेल्या आहेत.

१. **श्रम प्रतिष्ठा:** बसवन्नांनी 'कायकवे कैलास' हा मंत्र दिला. त्यांच्या मते, देवळात जाऊन देवाची पूजा करण्यापेक्षा स्वतःचे काम प्रामाणिकपणे करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. प्रत्येकाने स्वतःचे काम (कायक) करूनच मंटपात यावे, असा नियम होता. काम न करणाऱ्या व्यक्तींना किंवा इतरांवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना तिथे स्थान नव्हते.

२. **समानता** : कायक तत्त्वानुसार कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते. राजाचे काम आणि झाडूवाल्याचे काम या दोघांनाही समाजात समान प्रतिष्ठा असायला हवी.

३. **स्वावलंबन**: प्रत्येकाने स्वतःच्या कष्टावर जगले पाहिजे. दुसऱ्याच्या श्रमावर जगणे किंवा भिक्षा मागणे बसवन्नांनी निषिद्ध मानले. अगदी संतांनी किंवा गुरुंनी सुद्धा स्वतःचे कायक करूनच उदरनिर्वाह करावा, असा त्यांचा नियम होता.

४. **प्रामाणिकता**: कायक म्हणजे केवळ काम नव्हे, तर ते 'निस्वार्थ' आणि 'प्रामाणिक' असायला हवे. त्यात फसवणूक किंवा भ्रष्टाचार नसावा.

***दसोह - 'समर्पित सेवा'**

'दसोह' ही संकल्पना 'कायक'ला पूर्णत्व देते. कष्टाने मिळवलेल्या धनाचा विनियोग कसा करावा, हे 'दसोह' सांगते. दासोह शब्दाचा अर्थ: 'मी तुमचा दास आहे' या भावनेतून केलेली सेवा म्हणजे दसोह.

या संकल्पनेत खालील गोष्टी महत्वाच्या मानलेल्या आहेत.

१. **सामाजिक उत्तरदायित्व**: कायक मधून गरजेपेक्षा जास्त मिळालेले धन स्वतःजवळ साठवून न ठेवता ते समाजाला (गरजूंना) अर्पण करणे म्हणजे दसोह.

२. **संग्रहवृत्तीला विरोध**: बसवन्नांनी संपत्ती साठवण्याच्या प्रवृत्तीला विरोध केला. त्यांच्या मते, अतिरिक्त संपत्ती ही समाजाची आहे आणि ती समाजाकडेच परत गेली पाहिजे.

३. **अहंकाररहित दान**: दसोह करताना 'मी दान देतोय' हा अहंकार नसावा. उलट, 'समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली' ही कृतज्ञतेची भावना असावी.

४. **आर्थिक विषमता कमी करण्यास मदत** : कायक आणि दसोह या संकल्पना एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कायक मुळे माणूस 'उत्पादक' बनतो. दसोह मुळे माणूस 'परोपकारी' बनतो. यामुळे समाजात आर्थिक विषमता राहत नाही. जेव्हा प्रत्येक जण कष्ट करतो (कायक) आणि गरजेपुरते ठेवून उरलेले समाजाला देतो (दसोह), तेव्हा गरिबी आणि भूक आपोआप नष्ट होते. थोडक्यात कार्ल मार्क्सच्या अनेक शतकांपूर्वी बसवन्नांनी 'प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेनुसार काम आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार मोबदला' हे सूत्र दसोहच्या माध्यमातून मांडले होते.

**५. बसवेश्वर यांची वचने व त्यामधील राजकीय व प्रशासकीय मांडणी**

**१."एनु बंदेरी? सुखविद्धीरे? एंदरे,**
**निमगागिदा इष्टसिद्धिगाळव्वो!"**

लोकशाही व राजाची कर्तव्ये सांगत असताना बसवन्नांनी राजाला (सत्ताधाऱ्याला) जनतेचा मालक नाही तर 'सेवक' मानले होते

**२."इवनारवा, इवनारवा, इवनारवा नेन्नदिरय्या,**
**इवन नम्मवा, इवन नम्मवा, इवन नम्मवा नेन्नदिरय्या."**

समता आणि सामजिक न्याय निर्माण होवून राजकारणात जातीपातीचा प्रभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी कडक भूमिका घेतली होती.

**३.कळबेअडा, कोल्लेअडा, हुसिया नुडियबेअडा**
**मुनियबेअडा, अन्यरिगे असह्य पडबेअडा**
**तन्न बन्निसबेअडा, इधिरु हलियबेअडा**
**इदे अंतरंग शुद्धी, इदे बहिरंग शुद्धी**
**इदे नम्म कूडल संगमदेवन ओलिसुव परी.**

भ्रष्टाचारमुक्त प्रशासन (नैतिकता) सरकारी तिजोरीवर कोणाचा अधिकार असावा, यावर त्यांनी भाष्य केले आहे.

**६. महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे राजकीय-प्रशासकीय परिणाम :**

महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे तत्कालीन आणि आधुनिक राजकीय-प्रशासकीय व्यवस्थेवर झालेले परिणाम अत्यंत दूरगामी आहेत. त्यांनी केवळ तत्त्वज्ञान मांडले नाही, तर राजा बिज्जल यांच्या दरबारात 'महाप्रधान' (पंतप्रधान) म्हणून ते प्रत्यक्ष अमलात आणले. त्यांच्या विचारांचे राजकीय आणि प्रशासकीय परिणाम खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येतील:

**अ. सत्तेचे विकेंद्रीकरण :** बसवन्नांनी सत्तेचे केंद्र एका राजाच्या हातातून काढून ते लोकांच्या हातात दिले. 'अनुभव मंटप' हे

त्याचे उत्तम उदाहरण आहे.

**परिणाम:** धोरण ठरवताना केवळ राजाचा शब्द अंतिम न राहता, समाजातील विविध घटकांशी चर्चा करून निर्णय घेण्याची पद्धत रूढ झाली. ही आजच्या **लोकशाही प्रशासनाची** मूळ संकल्पना आहे.

**ब. प्रशासकीय पारदर्शकता आणि भ्रष्टाचार निर्मूलन :** 'कायक' (प्रामाणिक श्रम) या तत्त्वाचा प्रशासनावर मोठा प्रभाव पडला.

**परिणाम:** सरकारी तिजोरीतील पैसा हा 'जनतेचा पैसा' आहे आणि तो केवळ जनहितासाठीच वापरला पाहिजे, हा नियम त्यांनी लावला. त्यांनी स्वतः पंतप्रधान असताना अत्यंत साधेपणाने राहून भ्रष्टाचाराला पूर्णपणे पायबंद घातला होता.

**क. मानवाधिकार आणि सर्वसमावेशक प्रशासन :** त्या काळी प्रशासनात केवळ उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. बसवन्नांनी हे चित्र बदलले.

**परिणाम:** दलित, वंचित आणि स्त्रियांना प्रशासकीय प्रक्रियेत आणि सामाजिक निर्णयात स्थान दिले. यामुळे समाजात **'सामाजिक न्यायाची' (Social Justice)** संकल्पना प्रशासकीय स्तरावर प्रथमच राबवली गेली.

**ड. आर्थिक स्वावलंबन आणि कर व्यवस्था** 'दसोह' या संकल्पनेचा परिणाम राज्याच्या आर्थिक धोरणावर झाला.

**परिणाम:** राज्याचा कर हा जनतेवर बोजा न ठरता, तो समाजातील गरजूंच्या कल्याणासाठी उदा. मोफत अन्न, निवारा) वापरला जाऊ लागला. श्रीमंतांकडून अतिरिक्त संपत्ती घेऊन ती गरिबांमध्ये विभागण्याचे एक नैसर्गिक चक्र त्यांनी निर्माण केले.

**इ. कायदेमंडळाची पूर्वकल्पना :** अनुभव मंटपमध्ये होणाऱ्या चर्चांमधून जे निष्कर्ष निघत, ते समाजासाठी 'नियम' किंवा 'कायदे' म्हणून स्वीकारले जात असत.

**परिणाम:** हे आजच्या **संसदीय कार्यप्रणालीचे** सुरुवातीचे रूप होते. वचनांच्या माध्यमातून त्यांनी एक 'नैतिक कायदेसंहिता' तयार केली होती.

**फ. महिलांचे राजकीय सबलीकरण**

प्रशासकीय आणि वैचारिक चर्चांमध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान देणे हा एक मोठा राजकीय बदल होता.

**परिणाम:** अक्कमहादेवी आणि इतर शरण महिलांनी प्रशासकीय विचारात मोलाची भर घातली. यामुळे स्त्रियांना समाजात आणि राजकारणात 'स्वतंत्र ओळख' मिळाली.

## ७. निष्कर्ष

१. **महात्मा बसवेश्वर यांनी राजकारण आणि प्रशासकीय नीतिमत्तेवर भाष्य करणारी अनेक वचने लिहली त्यामध्ये 'लोकशाही'**, **'समानता'** आणि **'राज्यकर्त्यांची जबाबदारी'** स्पष्टपणे दिसून येते.

२. **आधुनिक प्रशासनावर प्रभाव :** बसवन्नांचे विचार हे आधुनिक **'कल्याणकारी राज्याच्या' (Welfare State)** संकल्पनेशी जुळणारे आहेत. भारतीय संविधानातील कलम १४ (समानता) आणि कलम १७ (अस्पृश्यता निवारण) यांची बीजे ८०० वर्षांपूर्वी बसवन्नांच्या प्रशासकीय कार्यात पाहायला मिळतात.

३. **ऐतिहासिक महत्त्व** : ब्रिटिश संसदेतिल मॅग्नाचार्ट (Magna Carta, १२१५) सनद ही लोकशाहीची जननी मानले जाते, परंतु बसवन्नांनी त्याच्याही आधी (११५०-११६० च्या सुमारास) अनुभव मंटपच्या माध्यमातून लोकशाहीची तत्त्वे अमलात आणली होती. म्हणूनच तत्कालीन राजकीय विचारात हे एक अत्यंत प्रगत पाऊल मानले जाते.

४. **कल्याणकारी राज्याची संकल्पना** (Welfare State) राज्याचा महसूल हा जनतेच्या कल्याणासाठीच वापरला जावा. 'दसोह' (दासोह) या संकल्पनेतून त्यांनी संपत्तीच्या समान वाटपाचा विचार मांडला. ज्यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त आहे, त्यांनी ते समाजाला परत देणे हे राज्याचे कर्तव्य असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

५. **मानवाधिकार आणि सामाजिक न्याय** : बसवन्नांनी वर्णाश्रम व्यवस्था नाकारून 'मनुष्यकुळ एकच आहे' हा विचार दिला. राजकीय पटलावर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी स्त्रियांना प्रशासकीय चर्चेत स्थान दिले

६. **बसवेश्वरांचे विचार आधुनिक आणि प्रासंगिक आहेत** : आजच्या संसदीय लोकशाहीत आपण ज्या मूल्यांचा (स्वातंत्र्य, समता, बंधुता) विचार करतो, ती मूल्ये बसवन्नांनी ८०० वर्षांपूर्वी अमलात आणली होती. भारतीय संविधानातील अनेक

तरतुदी आणि बसवन्नांचे 'वचन साहित्य' यात कमालीचे साम्य दिसून येते.

थोडक्यात महात्मा बसवेश्वर यांचे राजकीय आणि प्रशासकीय विचार हे केवळ १२ व्या शतकापुरते मर्यादित नसून, ते आधुनिक लोकशाहीचे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या **'इवनारवा, इवनारवा'** (हा कोणाचा? असे न विचारता, हा आमचाच आहे असे म्हणा) या वचनातून त्यांनी 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'सर्वसमावेशकतेचा' जो विचार मांडला, तोच आजच्या भारतीय संविधानाचा प्राण आहे. **"बसवण्णा हे खऱ्या अर्थाने लोकशाहीचे पहिले प्रणेते होते** "काळाच्या खूप पुढे असणारे 'क्रांतीकारक' होते. त्यांचे विचार आत्मसात करणे, हीच आजच्या काळातील सुशासनाची खरी गरज आहे.

### संदर्भ ग्रंथसूची (Bibliography)

१. भोसले, शिवाजीराव. *महात्मा बसवेश्वर आणि लोकशाही*, चैतन्य प्रकाशन, पुणे.
२. मैनापुरे, अशोक. *महात्मा बसवेश्वर: कार्य आणि विचार*, विमल प्रकाशन, लातूर.
३. गायकवाड, जयदेवराव. *क्रांतीनायक बसवण्णा*, सुगावा प्रकाशन, पुणे.
४. गोसावी, र. रा. *महात्मा बसवेश्वर वचनसाहित्य*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
५. साळुंखे, ए. एच. *महात्मा बसवेश्वर आणि परिवर्तनाचे विचार*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
६. कलबुर्गी, एम. एम. (अनु. उमा कुलकर्णी). *बसव तत्त्वसार*, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.
७. देशमुख, बा. ल. *महात्मा बसवेश्वर: एक महान युगपुरुष*, अक्षय प्रकाशन, कोल्हापूर.